# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon


## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १५ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या  बी.एस्सी.परीक्षेत सर्व विषयातून  विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस` कै.इच्छाराम रामभाऊ सरोदे सुवर्णपदक` प्रदान करण्यासाठी डॉ.राजेंद्र सरोदे यांच्या मातोश्री राजस सरोदे यांनी  कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे दोन लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

राजस सरोदे यांनी हे सुवर्णपदक  प्रायोजित केले असून बी.एस्सी परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस कै.इच्छाराम रामभाऊ सरोदे यांच्या नावे सुवर्णपदक दिले जाणार आहे. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, डॉ.राजेंद्र सरोदे, डॉ.वैशाली सरोदे, कुलसचिव भ.भा.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील हे उपस्थित होते.

---

**बातमी क्र.२**

**<u>मुंबई  विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी विनोद पाटील</u>**

जळगाव दि.१५ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील पध्दती विश्लेषक डॉ.विनोद पाटील यांची मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी निवड करण्यात आली आहे.

डॉ.विनोद पाटील हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेवेत सन १९९४ पासून कार्यरत आहेत. प्रारंभी डाटा एन्ट्री ऑपरेटर त्यानंतर पध्दती विश्लेषक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. अंतुर्ली ता.मुक्ताईनगर हे मुळ गाव असलेल्या डॉ.पाटील यांचे शालेय शिक्षण जवाहर हायस्कूल, गिरड,ता.भडगाव येथे झाले. त्यानंतर चाळीसगावच्या बी.पी.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातून बी.सी.एस., नुतन मराठा इन्स्टिटयूटमधून एम.सी.एम पूर्ण केले. `फिजिबीलिटी स्टडी ऑफ एक्झाम रिफॉर्मस् इन युनिव्हर्सिटी इन महाराष्ट्र युजिंग आयसीटी स्पेशल रेफरन्स ऑफ एनएमयू` या विषयात पीएच.डी केली आहे. परीक्षा विभागातील ऑनस्क्रीन मूल्यमापन, ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण, बारकोड यामध्ये डॉ.पाटील यांचे योगदान आहे. मुंबई विद्यापीठात यापूर्वी सन २०१२-१३ मध्ये एक वर्ष उपकुलसचिव या पदावर काम केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा गौरव झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

---

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९                                        दिनांकः- १५ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( डॉ.सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी